‘जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे’ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ >> पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे तीन सामंजस्य करार >> पान 3

महापुरुषाच्या विटंबना प्रकरणी अंजनीत तणावाचे वातावरण >> पान 4


**सुविचार**

आयुष्यातील छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 243 ■ बुधवार, दि. 16 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





हा चित्रपट सर्वोत्तपरी वाईट आहे, छावामध्ये काम करणाऱ्या मराठी अभिनेत्याची थेट टीका

आतील पान


# मंत्रिमंडळ बैठकीत एकनाथ शिंदेंच्या खात्याचे ३ धडाकेबाज निर्णय

## नगराध्यक्षांना बहुमताने हटवणार; कॅबिनेटमध्ये ७ मोठे निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज महत्त्वाचे ७ निर्णय घेण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. त्यामध्ये, गृह, महसूल, नगरविकास आणि विधी व न्याय विभागाच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या नगरविकास विभागातील सर्वाधिक ३ निर्णय घेण्यात आले आहेत. त्यात, नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदींस मान्यता देण्यात आली आहे.





महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ करून कर वसूलीसाठी व्हावी यासाठी अभय योजना लागू करण्याचा महत्त्वाचा निर्णय देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तर, लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील ७ निर्णय

विधि व न्याय विभाग

चिखलोली-अंबरनाथ येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय

ठाणे जिल्ह्यातील चिखलोली-अंबरनाथ येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्याचा व त्याअनुषंगाने आवश्यक पदे मंजूर करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या नव्याने स्थापन होणाऱ्या न्यायायलाकडे उल्हासनगर येथून १४ हजार १३४ फौजदारी व १ हजार ३५ दिवाणी अशी एकूण १५ हजार ५६९ प्रकरणे वर्ग होणार आहेत. यातून प्रलंबित प्रकरणाचा निपटारा गतीने होणार आहे.

या न्यायालयासाठी १२ नियमित पदे व ४ पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. >> पान २

### बीड पुन्हा हादरले! आधी युवकाला भोसकून संपवले, नंतर कोयत्यासह आरोपी पोलीस ठाण्यात

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणाचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. या हत्या प्रकरणानंतर बीडमधील गुन्हेगारीचे अनेक प्रकरणे समोर येत आहे. आता बीडच्या माजलगाव येथे एका युवकाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तर हत्येनंतर आरोपी स्वत: कोयत्यासह पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने बीडमध्ये एकच खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यात महिन्याभरात तिसरी हत्या झाली असून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव येथे बाबासाहेब प्रभाकर आगे याच्यावर आरोपी नारायण फपाळ याने बाजार रोड परिसरात धारदार शस्त्राने हल्ला चढवला. या हल्ल्यात बाबासाहेब प्रभाकर आगे याचा जागीच मृत्यू झाला आहे. मयत हा किट्टी आडगाव येथील रहिवासी असून भाजपचा बूथ विस्तारक म्हणून देखील काम पाहत असल्याची माहिती समोर आली आहे.

### सलमान खानला जीवे मारणाऱ्याची धमकी देणारा गुजरातमध्ये सापडला, पोलिसांनी दिली धक्कादायक माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेता सलमान खानला जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. वरळी वाहतूक नियंत्रण कक्षाला सलमान खानवर हल्ला करणार असल्याचा मेसेज आला होता. यानंतर मुंबई पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत या प्रकरणाचा सखोल तपास करून २४ तासांच्या आत सलमान खानला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या तरुणाला शोधून काढलं आहे.

अभिनेता सलमान खानला जीवे मारण्याची धमकी देणारी व्यक्ती गुजरातमधील वडोदरा जिल्ह्यातील आहे. ही व्यक्ती मानसिक आजारी आहे. हा तरुण गुजरातमधील वडोदरा जिल्ह्यातील वाघोडिया या गावाचा रहिवासी असल्याचं तपासात स्पष्ट झालं आहे. परंतु, अद्याप या तरुणाला अटक केलेली नाही. तपासानंतर २६ वर्षीय तरुणाला नोटीस पाठवून मुंबई पोलिसांसमोर चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिलेत, अशी माहिती पोलिसांनी दिली. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सअप क्रमांकावर रविवारी एक संदेश आला होता. यात अभिनेता सलमान खानला घरात घुसून जीवे मारण्याची आणि सलमानची गाडी बॉम्बनं उडवण्याची धमकी देण्यात आली होती.

## मान्सून जोरदार बरसणार; हवामान खात्याकडून गुड न्यूज

### यंदा अल निनोची शक्यता नाही, पाऊसही सामान्यपेक्षा चांगला!



**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील शेतकऱ्यांसाठी चांगली बातमी असून यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामान खात्याने देशात सरासरीच्या १०५ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यंदा मान्सूनवर अल निनोचा धोका नसल्याने देशात चांगला पाऊस पडणार आहे असं हवामान खात्याने सांगितलं आहे. हा मान्सूनचा पहिला अंदाज असून पावसाळ्याच्या तोंडावर आणखी एक अंदाज व्यक्त केला जात आहे.

पावसाची टक्केवारी कशी काढली जाते?

- हवामान विभागाने पावसाच्या प्रमाणाच्या अशा पाच श्रेणी ठरवल्या आहेत.

- ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस – अपुरा पाऊस

- ९० ते ९५ टक्के – सरासरीपेक्षा कमी पाऊस

- ९६ ते १०४ टक्के – सरासरीइतका पाऊस

- १०५ ते ११० टक्के – सरासरीपेक्षा जास्त पाऊस

- ११० टक्क्यांपेक्षा जास्त – सर्वाधिक पाऊस

मान्सून १ जूनला केरळच्या किनाऱ्यावर धडकणार

सर्वसाधारपणे १ जून रोजी केरळमध्ये मान्सूनचे आगमन होते. त्यानंतर सात ते आठ दिवसा मान्सून मुंबईच्या किनाऱ्यावर धडकतो. यंदाही सरासरीच्या जास्त पावसाचा अंदाज व्यक्त केला गेल्याने मान्सून त्याच्या नियमित वेळेत भारतात >> पान २

## एसटी- टेम्पोची जबर धडक; बुलढाण्यात चौघांचा जागीच मृत्यू, अनेक जखमी

### मुंबई ते नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील घटना

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/प्रतिनिधी :** मध्य प्रदेश परिवहनची एसटी बस व विटांनी भरलेला मेटाडोर समोरासमोर धडक झाल्याने घडलेल्या भीषण अपघातात चार प्रवाशी जागीच ठार झाले.तर, १९ जण प्रवासी जखमी झाले.ही घटना जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील आमसरी गावाजवळ १५ एप्रिल रोजी मुंबई ते नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर घडली. हा अपघात इतका भीषण होता की टेम्पो मधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. तर, बसमधील एका व्यक्तीलाही आपला जीव गमवावा लागला. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर काहींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी खामगाव रुग्णालयात हलविण्यात आले.

सदर घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार, मध्यप्रदेश परिवहनची बस महाराष्ट्रातील अमरावतीहून मध्यप्रदेशातील बुरहानपूरला जात होती. आमसरी फाटाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या एका मेटाडोर बसला धडक दिली. या अपघातात बसमधील तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर १९ जण जखमी झाले. जखमींना तात्काळ खामगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मदत आणि बचाव कार्य सुरू केले. मृतांची ओळख पटवली जात आहे आणि त्यांच्या कुटुंबियांना माहिती देण्यात आली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या घरी शोककळा पसरली आहे.

### अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी, तामिळनाडूतून ई-मेल आला

नवी दिल्ली : अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. तशा आशयाचा एक ई मेल अयोध्या राम मंदिर ट्रस्ट आणि उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांच्या डीएमना आला आहे. सोमवारी रात्री हा धमकीचा ई मेल आला होता. या प्रकरणी अयोध्येच्या सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. हा ई मेल तामिळनाडूतून आल्याची माहिती आहे.

सोमवारी रात्री रामजन्मभूमी ट्रस्टच्या मेलवर धमकीचा मेल आला होता. ’मंदिराची सुरक्षा वाढवा’ असं त्यामध्ये लिहिण्यात आलं होतं. धमकीचा मेल मिळाल्यानंतर व्यापक शोध मोहीम सुरू करण्यात आली. राम मंदिर ट्रस्टने एफआयआर दाखल केला आहे.

अयोध्येसोबतच बाराबंकी आणि चंदौलीसह इतर अनेक जिल्ह्यांनाही धमकीचे मेल आले आहेत. >> पान २

# लाडक्या बहिण योजनेत काहींना ५०० रुपयांचा हप्ता

## मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून मोठा खुलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लाडकी बहीण योजनेच्या काही लाभार्थी महिलांना केवळ ५०० रुपयांचा हफ्ता दिला जाणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणी नाराज होण्याची शक्यता आहे. या मुद्द्यावरुन विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला. यानंतर आता मंत्री आदिती तटकरे यांनी यावर खुलासा केला आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील काही महिलांना १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयांचा हफ्ता दिला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. यावरुन विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला. यानंतर आता राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती



तटकरे यांनी खुलासा केला आहे.

‘‘ २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे‘‘, असं मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.‘‘त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७७४१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे‘‘, असं स्पष्टीकरण आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट करत दिलं आहे. एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे, किंवा योजनेच्या दैदीप्यमान यशाने त्यांचे मनोबल खचले आहे. विरोधकांच्या या अपप्रचाराला माझ्या लाडक्या बहिणी बळी पडणार नाहीत ही मला खात्री आहे‘‘, असंही आदिती तटकरे यावेळी म्हणाल्या.

### राज्यभरात ८ लाख लाडक्या बहिणींना ५०० रुपयांचा हफ्ता

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी ठरलेल्या राज्यातील तब्बल ८ लाख महिलांना आता १५०० रुपयांऐवजी दर महिन्याला केवळ ५०० रुपयांचा हफ्ता मिळणार असल्याची माहिती मिळत आहे. या ८ लाख महिलांना नमो शेतकरी महासन्मान निधी मिळत असल्याने त्यांना आता १५०० रुपयांऐवजी केवळ ५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या छाननीत ८ लाख लाडक्या बहिणींना नमो शेतकरी महासन्मान निधीची मदत मिळत असल्याचे समोर आले. त्यामुळे या महिलांच्या आर्थिक मदतीत १००० रुपयांची कपात करण्यात येणार आहे. येत्या महिन्यापासूनच महिलांच्या हफ्त्यात कपात होणार असल्याची माहिती आहे.

## विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांची आज जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ''मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो.'' त्यांचा आत्मविश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली. पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात '' ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळखयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा.'' चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट द कीड याचं ओपनिंग टायटल होतं '' अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर.'' स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत. आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता प्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पड्याआड गेला. विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

# 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ


## जल व्यवस्थापनाच्या जनजागृती उपक्रमात सर्व यंत्रणांनी सक्रिय सहभाग घ्यावा– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :जलसाक्षरता वाढवणे, पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देणे आणि जलव्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविण्यासाठी जलसंपदा विभागाच्यावतीने 'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा' शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत १५ एप्रिल रोजी करण्यात आला. जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यातील कार्यक्रमांमध्ये प्रत्येक पालकमंत्री महोदयांनी सक्रिय सहभागी घेऊन कामे करून घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

जलसंपदा विभागाच्या वतीने १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत जलव्यवस्थापन कृती पंधरवडा साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याचे उद्घाटन मंत्रालयातील मंत्रीमंडळ सभागृहात झाला. त्यावेळी जलसंपदा ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, जलसंपदा( विदर्भ, तापी, कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या पोस्टरचे अनावरण झाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या माध्यमातून समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत जनजागृती वाढविण्यात यावी. राज्यातील सिंचन व बिगर सिंचनासाठी आवश्यक पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. परंतु लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे हा उपक्रम लोकाभिमुख करण्यासाठी सर्व यंत्रणा व घटकांनी सक्रिय सहभाग घ्यावा.

जलव्यवस्थापन कृती पंधरवडामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम १५ एप्रिल २०२५ रोजी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ साजरा करणे व जलसंपदा पंधरवडा शुभारंभ, १६ एप्रिल रोजी जलसंपदा अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण व ई–ऑफिस प्रणाली कार्यान्वित करणे, १७ एप्रिल रोजी स्वछ व सुंदर माझे कार्यालय, जल पुनर्भरण ( ), १८ एप्रिल रोजी शेतकरी/पाणी वापर संस्था संवाद, १९ एप्रिल रोजी भूसंपादन व पुनर्वसन इ. अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, २० एप्रिल रोजी कालवा स्वच्छता अभियान, २१ एप्रिल रोजी उपसा सिंचनाचे पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारींची निरसन करणे, २२ एप्रिल रोजी अनधिकृतपणे वाणिज्य व औद्योगिक पाणी उपसा प्रकरणे शोध घेऊन कार्यवाही करणे , २३ एप्रिल रोजी जलसंपदा व कृषी विभागामार्फत संयुक्तपणे पीक पद्धतीबदल, उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन इ. बाबत बैठक/कार्यशाळा मार्गदर्शन कार्यक्रम, २४ एप्रिल रोजी सिंचन ई–प्रणाली, पाणी दर, पाणीपट्टी आकारणी व वसुली, थकीत पाणीपट्टी प्रकरणांचा आढावा, २५ एप्रिल रोजी विद्यापीठ/केव्हिके/ सेवाभावी संस्था यांच्या समवेत संवाद व कृती कार्यक्रम, २६ एप्रिल रोजी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्या प्रत्यक्ष पाणी वापराचा जललेखा परीक्षण व पाण्याचा पुनर्वापर न करता धरणांमध्ये व नदीमध्ये सांडपाणी सोडण्यात येत असल्याबद्दल प्रकरणांचा शोध घेणे, २७ एप्रिल रोजी आपत्ती व्यवस्थापन



करण्यात मार्गदर्शन (पूर/मालमत्तेचे रक्षण), २८ एप्रिल रोजी महसूल विभागाच्या समन्वयाद्वारे महामंडळाचे नावे संपादित जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावर नोंदी घेणे/अतिक्रमण निष्कासन ३१ मे पूर्वी करणे, २९ एप्रिल रोजी पाणी वापर संस्था सक्षमीकरण चर्चासत्र/कार्यशाळा आणि ३० एप्रिल २०२५ रोजी मा. पालकमंत्री यांच्या उपस्थितीत जिल्हा मुख्यालयी कार्यशाळा/महिला मेळावा आणि या पंधरवडा कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या अभियंत्यांचा सत्कार व पंधरवडा समारोप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदा( विदर्भ, तापी, कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

पान १ वरुन...

## मंत्रिमंडळ बैठकीत एकनाथ शिंदेंच्या

याठिकाणी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग , सहायक अधिक्षक, लघुलेखक प्रत्येकी एक, वरिष्ठ लिपीक (२), कनिष्ठ लिपीक (४), बेलिफ (३) आदी पदांचा यामध्ये समावेश आहे. या न्यायालयासाठी आवश्यक अशा एकूण अंदाजे रुपये ८४ लाख ४० हजार ३३२ रुपयांच्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली आहे.

गृह विभाग

कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाईचे धोरण निश्र्चित

राज्यातील कारागृहांमध्ये कोठडीत असलेल्या कैद्यांचा मृत्यू अनैसर्गिक कारणांमुळे झाल्यास त्याच्या वारसांना राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या सूचनेनुसार भरपाई देण्याच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणानुसार कारागृहामध्ये काम करताना झालेल्या अपघातामुळे, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे, कारागृह कर्मचाऱ्यांच्या मारहाणीमुळे किंवा कैद्यांच्या आपापसातील भांडणात मृत्यू झाल्यास आणि संबंधित प्रकरणात प्रशासनाचा निष्काळजीपणा चौकशीतून सिद्ध झाल्यास, कैद्याच्या वारसांना पाच लाख रुपयांची भरपाई दिली जाणार आहे. तुरुंगवासातील आत्महत्येच्या प्रकरणात कैद्याच्या वारसांना एक लाख रुपयांची भरपाई देण्यात येणार आहे. राज्यातील सर्व कारागृहांमध्ये हे धोरण लागू राहणार आहे. कैद्याचा मृत्यू वार्धक्य, दीर्घ आजार, कारागृहातून पलायन करताना अपघातात, जामीनावर असताना, किंवा उपचार नाकारल्याने झाला असल्यास कोणतीही भरपाई देण्यात येणार नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झाल्यास मात्र शासनाच्या विद्यमान धोरणानुसार भरपाई मिळेल. भरपाईसाठी संबंधित कारागृह अधीक्षकांनी प्राथमिक चौकशी, शवविच्छेदन, पंचनामा, वैद्यकीय अहवाल, न्यायालयीन व जिल्हाधिकाऱ्यांचा तपास आदी कागदपत्रांसह अहवाल प्रादेशिक विभाग प्रमुखांकडे सादर करावा लागेल. यानंतर प्रकरणाची सखोल चौकशी करून अंतिम प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर केला जाईल. त्यांच्या शिफारशींच्यानंतर शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल आणि भरपाई दिली जाईल. मृत्युच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

नगरविकास विभाग

नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या भाडेपट्ट्यांच्या नियमांत बदल, नवीन दराबाबत अधिसूचना काढणार

राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता व नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यात येणार हे. त्याकरिता नवीन दरांबाबत अधिसूचना काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील महानगरपालिकांच्या स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देणे, त्यांचे नूतनीकरण व हस्तांतरण याबाबत ६ नोव्हेंबर २०२३ रोजी नियम निश्र्चित करण्यात आले आहेत. त्यालाच अनुसरून आता राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांतील मालमत्तांच्या हस्तांतरणांत एकवाक्यता आणण्यात येणार आहे. त्यासाठी महानगरपालिका मालमत्ता हस्तांतरण नियमावलीच्या धर्तीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) (सुधारणा) नियम २०२५ निश्र्चित करण्यात येणार आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी यांच्या मालमत्तांचे निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक, व्यावसायिक व औद्योगिक असे वर्गीकरण करण्यात आले आहे. यात सुधारित नियमानुसार निवासी, शैक्षणिक, धर्मादाय व सार्वजनिक वापरासाठीच्या मालमत्तांचा भाडेपट्टा दर हा वर्तमान बाजारमूल्याच्या (रेडी रेकनर) ०.५ टक्के पेक्षा कमी असणार नाही. तसेच व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठीच्या मालमत्तेचा बाजारमूल्याच्या ०.७ टक्के पेक्षा कमी असणार अशी तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या मालमत्तांचे अधिमुल्य, भाडेपट्टा दर व सुरक्षा ठेव निश्र्चिती ही संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समिती करेल.

सदर नियमांबाबत हरकती व सूचना मागविण्यात येतील व त्यानंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

नगरविकास विभाग

नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करासाठी अभय योजना

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरी क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर वसूलीकरीता दंड माफ करून वसूली वाढविण्यासाठी अभय योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्तांच्या थकीत करांवर दरमहा २% दंड लावण्याची तरतूद आहे. यामुळे मालमत्ता धारकाच्या एकूण थकबाकीमध्ये वाढ होऊन दंडाची ही रक्कम अनेकदा मूळ कराच्या रकमेपेक्षा अधिक होते. मूळ कराच्या रकमेपेक्षा दंडाची रक्कम अधिक झाल्याने मालमत्ताधारक कर भरण्यास टाळाटाळ करतात. यावर उपाय म्हणून थकीत मालमत्ता करावरील दंड माफ करून अभय योजना लागू करण्यात येणार आहे. यापुर्वीच्या अधिनियमात अशा अशा दंड माफीची तरतूद नाही. तशी तरतूद अधिनियमात करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

नगरविकास विभाग

नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना हटविण्याचे अधिकार आता सदस्यानांच! त्यासाठी अधिनियमात सुधारणा करणार

राज्यातील नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचे अधिकार सदस्यांना देण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या तरतुदींस मान्यता देऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यापुर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्याच्या प्रक्रियेत निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर कार्यवाही अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कार्यवाही केली जात असे. त्याऐवजी आता अध्यक्षांना पदावरून हटवण्यासाठी निवडून आलेल्या सदस्यांना अधिकार दिले जाणार आहेत. त्यानुसार निवडून आलेल्या सदस्य संख्येपैकी दोन तृतीयांश संख्येने सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव पाठवला जाईल. ज्यावर जिल्हाधिकाऱ्यांना दहा दिवसांच्या आता विशेष सभा आयोजित करून मतदानाद्वारे निर्णय घ्यावा लागेल. याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्यास तसेच त्यासाठीचा अध्यादेश काढण्यास मान्यता देण्यात आली.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये यावर्षीपासून अभियांत्रिकीचे तीन नवीन पदवी अभ्यासक्रम

लातूरमधील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये २०२५–२५ या शैक्षणिक वर्ष पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे तीन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्याचबरोबर पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनचे नामकरण पुरणमल लाहोटी शासकीय अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था, लातूर असे करण्याचा निर्णयदेखील बैठकीत घेण्यात आला आहे. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन संस्थेत अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता व डेटा सायन्स हे तीन नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता ६० इतकी असेल. हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी नवीन शिक्षकांची ३६ पदे व शिक्षकेतर ३१ पदांची निर्मिती व पदभरती करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या पदांच्या वेतनावरील व पुस्तके, फर्निचर, संगणक, उपकरणे याकरिता आगामी चार वर्षांसाठीच्या २६ कोटी ६१ लाख रुपये खर्चाच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे.

## मान्सून जोरदार बरसणार;

येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्कायमेटनेही या आधी मान्सूनबाबत अंदाज वर्तवला आहे. त्यामध्ये म्हटलंय की, ला निना या हंगामात कमकुवत आणि संक्षिप्त असेल. ला निनाचे चिन्ह आता धुसर होत आहे. मान्सूनवर विपरीत परिणाम करण्याऱ्या एलनिनोची शक्यता नाकारण्यात आली आहे. एलनिनो दक्षिणी दोलन फार न्यूट्रल राहणार असल्यानं भारतात मान्सूनच्या पावसावेळी तो प्रभावी घटक ठरणार आहे. ला निना कमकुवत असणं आणि एलनिनो प्रभावी नसल्यानं मान्सूनचा पाऊस चांगला होऊ शकतो. हिंदी महासागरातील स्थिती एलनिनो प्रभावी न होण्यासाठी उपयोगी ठरु शकते. त्यामुळं मान्सूनचा पाऊस चांगला राहू शकतो, असा अंदाज स्कायमेटनं वर्तवला आहे. एलनिनो दक्षिणी दोलन प्रभावी नसणं त्याचवेळी आयओडी सकारात्मक असल्यानं चांगला पाऊस येऊ शकतो. मान्सूनच्या पहिल्या टप्प्यापेक्षा दुसऱ्या टप्प्यात चांगला पाऊस होऊ शकतो, असा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एलनिनोशिवाय इतर घटक देखील मान्सूनवर परिणाम करत असतात. आयओडी (इंडियन ओसियन डायपोल) सध्या प्रभावहीन असून यामुळं मान्सूनच्या सुरुवातीसाठी सकारात्मक चित्र आहे. एलनिनो दक्षिणी दोलन आणि आयओडी दोन्ही मान्सूनच्या प्रवासावर परिणाम करतात. चार महिन्यांपैकी अर्धा कालावधी झाल्यानंतर मान्सूनला अधिक वेग मिळू शकतो.

## अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने

बाराबंकी आणि चंदौलीच्या डीएमला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल आला आहे. अयोध्या आणि इतर जिल्ह्यांना पाठवलेला धमकीचा मेल हा तामिळनाडूतून आला असल्याची माहिती आहे. एफआयआर दाखल केल्यानंतर सायबर सेल पाठवलेल्या ईमेलची चौकशी करत आहे

मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाला अमेरिकेतून भारतात आणल्यानंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. या प्रकरणी गुप्तचर यंत्रणांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. त्यातच आता अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. राम मंदिराच्या सुरक्षेसाठी आधीच तैनात असलेल्या उठझऋ आणि णझडडऋ च्या तुकड्या आणखी मजबूत करण्यात आल्या आहेत. स्थानिक पोलिसांनी अतिरिक्त कर्मचारी तैनात केले असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून मंदिर परिसरावर नजर ठेवली जात आहे. प्रवेश करणाऱ्यांची कसून तपासणी केली जात आहे. गुप्तचर यंत्रणाही संभाव्य धोक्याची चौकशी करत आहेत. प्रशासनाने भाविकांना शांतता राखण्याचे आणि अफवांवर लक्ष न देण्याचे आवाहन केले आहे. अयोध्येतील राम मंदिराला धमक्या येण्याची ही पहिलीच वेळ नाही. सप्टेबर २०२४ मध्ये एका तरुणाने सोशल मीडियावर धमकी दिली होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे तीन सामंजस्य करार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : राज्यातील २० आय.टी.आय मध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे,सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळावे आयोजित करून रोजगार निर्मिती करणे आणि राज्यातील आयटीआय मध्ये शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यात येणार आहेत.आज कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि श्री. श्री. ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट () बेंगलोर, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशनु ()बेंगलोर,पुण्याची देआसरा फाउंडेशन,अंधेरी येथील प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आले.**

मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर कौशल्य विकास विभागाचे सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार,कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा मंत्रीमंडळातील सदस्य,राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक,कौशल्य विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा,कौशल्य विकास आयुक्त नितीन पाटील व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, सहसंचालक सतीश सुर्यवंशी,श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्तविजय हाके, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशनच्या सीएसआर प्रमुख रिचा गौतम, दामिनी चौधरी,प्रोजेक्ट मुंबईचे संचालक जलज दानी, दे आसरा या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पंडित यावेळी उपस्थित होते.



या कराराच्या माध्यमातून स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन या संस्थेतर्फे येणाऱ्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील २० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून इलेक्ट्रिशियन या व्यवसायाच्या कार्यशाळा ची दर्जा वाढ करण्यात येणार आहे व याचबरोबर सोलार टेक्निशियन लॅब व इंडस्ट्रियल ऑटोमेशन लॅब उभारून देण्यात येणार आहे. याचबरोबर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन तर्फे राज्यातील वीजतंत्री व्यवसायाच्या सर्व शिल्प प्रदेशांना बंगलोर येथे आधुनिक तंत्रज्ञान व सॉफ्ट स्किल्स चे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल.या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.यापूर्वीही स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन यांचे कडून अमरावती नाशिक यासारख्या संस्थांमध्ये इलेक्ट्रिशियन व्यवसायाच्या कार्यशाळेत शी दर्जावाढ करून देण्यात आलेली आहे.

राज्यातील विविध विभागांतील २० शासकीय केंद्रांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, नाशिक इत्यादी विभागांचा समावेश आहे. या प्रकल्पाअंतर्गत २०२५-२६ पासून पुढील चार वर्षांत प्रशिक्षण दिले जाईल. प्रत्येक वर्षी केंद्रांची संख्या आणि प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. पहिल्या वर्षात १० केंद्रांमध्ये १५०० युवकांना, दुसऱ्या वर्षात १५ केंद्रांमध्ये २२५०, तिसऱ्या वर्षात २० केंद्रांमध्ये ३००० युवकांना आणि चौथ्या वर्षात देखील ३००० युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.

### श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट,स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार

युवकांना नवीन तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट तसेच स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला.श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट ही एक सेवाभावी संस्था असून ही संस्था प्रशिक्षणार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, लीडरशिप व व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगारासाठी तर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन आपल्या सामाजिक दायित्व निधीद्वारे देशभरातील युवकांसाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार मिळवण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे कार्य करते.

### महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि देआसरा फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, अंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि पुणे येथील देआसरा फाउंडेशन या संस्थेसोबत उद्योजकता विकासाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि व्यावसायिक विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून पाठबळ देणे हा आहे. विविध जिल्ह्यांमध्ये उद्योजक मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांतून ५००० लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट असून, यामध्ये इच्छुक उद्योजक, व्यवसाय सुरू केलेले इनोव्हेटर्स व प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्स सहभागी होतील. देआसारा ही संस्था उद्योजकांना त्यांचा व्यवसाय सुरू करणे आणि वाढवण्यासाठी आवश्यक ती मदत व मार्गदर्शन करते.याअंतर्गत, संस्था व्यवसाय व्यवस्थापन,आर्थिक सहाय, विपणन आणि आर्थिक साक्षरता ,तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे, उद्योजकांच्या क्षमता विकसित करणे आणि उद्योजकतेसाठी योग्य वातावरण तयार करणं हे काम करेल.

### व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय आणि प्रोजेक्ट मुंबई सामाजिक संस्था यांच्यात सामंजस्य करार

महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि प्रोजेक्ट मुंबई या सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने आयटीआय मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे.प्रोजेक्ट मुंबई ही संस्था विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय आहे. याअंतर्गत आता ती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय सोबत एकत्र येऊन दिव्यांग विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करणार आहे.या करारानुसार एक संयुक्त कार्य समिती स्थापन करण्यात येणार आहे, ज्यामध्ये ५ सदस्य असतील त्यापैकी कडून तीन आणि प्रोजेक्ट मुंबई कडून २ सदस्यांचा समावेश असेल. ही समिती दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खास कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम तयार करेल, भारतीय सांकेतिक भाषामध्ये अभ्यासक्रम विकसित करेल, शिक्षकांचे प्रशिक्षण घेईल आणि उद्योग भागीदारांच्या सहकार्याने ऑन द जॉब ट्रेनिंग कार्यक्रम आयोजित करेल.

## संक्षिप्त...

### शासन-अधिकारी संघटनेतील संवाद सेतू हरपला; ज्येष्ठ नेते ग.दि. कुलथे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असे नेतृत्व आणि कुशल संघटक ज्येष्ठ नेते ग. दि. कुलथे यांच्या निधनामुळे शासन आणि अधिकारी-कर्मचारी संघटनेतील संवाद सेतू हरपला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.



मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, ग. दि. कुलथे यांनी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रश्न कौशल्याने सोडविले. पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असणारे कुलथे स्वभावाने अतिशय शांत आणि संयमी होते. मात्र, महत्वाच्या प्रश्नांवर त्यांनी अतिशय कणखर भूमिका घेतली. राजपत्रित अधिकारी महासंघाचे संघाचे प्रदीर्घकाळ नेतृत्व करताना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांत पारदर्शकता, संवेदनशीलता, जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी प्रयत्न केले. ''पगारात भागवा'' सारखा अनोखा उपक्रम राबवला. राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांनी नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदतीसाठी पुढाकार घेऊन महासंघाच्या वतीने मदतीचा हात पुढे केला. ज्येष्ठ नेते कुलथे यांच्या निधनामुळे अधिकारी कर्मचारी प्रिय नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

### मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेची मुद्द्यांवरून दिलजमाई? अनेक प्रश्नांवर एकच भूमिका?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून जे काही सामान्यांचे प्रश्न निर्माण होत आहेत किंवा मराठी आणि परप्रांतीय वाद निर्माण होत आहे त्यावर राज ठाकरे यांची मनसे आणि ठाकरेंची शिवसेना यांची भूमिका ही जवळपास एकसारखीच पाहायला मिळत आहेत. मग ते एलफिंस्टन ब्रिजचे पाडकाम असो वा मराठी-हिंदी वादावर घेतलेली भूमिका असो, यासह अनेक मुद्द्यावरून आता ठाकरेंची शिवसेना आणि मनसे आता एकच सूर आवळताना दिसत आहे.

कोणत्या मुद्द्यावरून ठाकरेंची शिवसेना आणि मनसेमध्ये एकमत?

मंगळवारी एलफिंस्टन ब्रिज पाडकामाच्या विरोधात जे आंदोलन झालं यावेळी एलफिंस्टन ब्रिजच्या एका बाजूला ठाकरेंच्या शिवसेनेकडून लाक्षणिक उपोषण करण्यात आलं. तर एलफिंस्टन ब्रिजच्या दुसऱ्या बाजूला मनसेकडून आंदोलन करण्यात आलं.

मराठी-हिंदी मुद्द्यावरुन मराठी माणसाच्या पाठीशी

एलफिस्टन ब्रिज आंदोलनच नाही तर मराठी-गुजराती, मराठी-हिंदी वादावर सुद्धा मराठी माणसांच्या बाजूने दोन्ही पक्ष अलीकडच्या काळात उभे राहिलेले पाहायला मिळतात आणि मराठीचा मुद्दा प्रकर्षाने घेताना दोन्ही पक्ष पाहायला मिळत आहे.

बँक आस्थापनांमध्ये मराठी भाषेचा आग्रह हा मनसेकडून धरला जात असताना आंदोलन केले जातं आहे. दुसरीकडे मोबाईल कंपनी आणि कॉर्पोरेट कार्यालयांमध्ये मराठीचा आग्रह, त्याशिवाय मराठी पाट्यांचा, हॉटेलमध्ये मराठी मेनूंच्या आग्रह मनसे प्रमाणे ठाकरेंची शिवसेना सुद्धा करताना पाहायला मिळत आहे.

औरंगजेबच्या कबरीवरुन एकच भूमिका

एवढेच काय तर औरंगजेबाच्या कबरीच्या संदर्भात जी भूमिका ठाकरे यांच्या शिवसेनेने मांडली तीच भूमिका मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि त्यांच्या पक्षाने मांडली. औरंगजेबाची कबर न हटवता तशीच राहू देऊन त्याला मराठी भूमीत गाढलं गेलं हे जगाला कळावं, शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचा इतिहास, त्यांचा पराक्रम हा जगाला कळवा अशी भूमिका मनसेने मांडली.

राष्ट्रीय स्वयंसेवर संघाचे भैय्याजी जोशी यांनी विद्याविहार मधील एका कार्यक्रमात गुजराती आणि मराठी भाषेसंदर्भात एक वक्तव्य केलं, त्यावेळी सुद्धा ठाकरेंच्या शिवसेनेकडून जी भूमिका घेण्यात आली तीच भूमिका राज ठाकरे यांनी ट्विटमध्ये मांडली.

आगामी काळात मुंबई महापालिकेच्या निवडणुका होणार आहे. त्या पाश्वभूमीवर भाजपने चांगलीच तयारी केली असून कोणत्याही परिस्थिती महापालिकेवर कब्जा मिळवायचाच या दृष्टीने काम सुरू केलंय. त्याचवेळी राज ठाकरेंची मनसे आणि उद्धव ठाकरेंची शिवसेनेनेही कंबर कसली आहे.

## हा चित्रपट सर्वोतपरी वाईट आहे, छावामध्ये काम करणाऱ्या मराठी अभिनेत्याची थेट टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** विकी कौशलचा 'छावा' सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. काही दिवसांतच चित्रपटाने कोट्यवधी रुपयांची कमाई केली. छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत विकी कौशलचं अभिनय पाहून प्रेक्षक भारावून गेले आहेत. चित्रपटातले संवाद, प्रत्येक सीन आणि संगीत प्रेक्षकांच्या मनात घर करून गेलं. काही दिवसांआधी सिनेमात काम करणारा रायाजी म्हणजेच अभिनेता संतोष जुवेकर त्याच्या काही वक्तव्यामुळे ट्रोल झाला होता. संतोषच्या ट्रोलिंगचं प्रकरण थांबत नाही तर आता छावामध्ये काम करणाऱ्या आणखी एका मराठी अभिनेत्यानं फेसबुकवर पोस्ट लिहित छावावर टीका केली आहे. त्यामुळे आता एक नवीन विवाद समोर आला आहे.

'छावा' चित्रपटात काम केलेल्या अभिनेत्याची टीका

या सिनेमात 'सूर्या' ही भूमिका साकारणाऱ्या आस्ताद काळे याने आपल्या फेसबुक पोस्टमधून छावा चित्रपटावर थेट टीका केली आहे. त्याने स्पष्टपणे सांगितलं की, छावा वाईट चित्रपट आहे, असं स्पष्ट वक्तव्य त्यानं केलं आहे. ज्या सिनेमात कम केलं त्याच सिनेमावर आस्तादनं बिनधास्तपणे टीका केली आहे. आस्ताद नेमकं काय म्हणाला आहे पाहूयात. आस्ताद काळेनं शेअर केलेल्या पोस्टमध्ये त्यानं लिहिलंय, ''मी आता खरं बोलणार आहे. छावा वाईट चित्रपट आहे. चित्रपट म्हणून वाईट आहे. इतिहास म्हणून बघायला गेलात तरी जीदंतस्रूम्‍ आहे. सर्वतोपरी वाईट आहे.'' या वक्तव्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

यावर न थांबता आस्तादनं पुढे लिहिलंय, ''हा कुठला इतिहास आहे? महाराणी सोयराबाई सरकारांनी छत्रपती संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाच्या मुलाला पत्र पाठवलं होतं? काय पुरावे आहेत याचे?'' या प्रश्नाबरोबर त्याने आणखी एक प्रश्न विचारलाय, त्याने लिहिलंय, ''सोयराबाई राणी सरकार परपुरुषासमोर बसून पान लावतायत आणि ते खात आहेत? हे कसं चालतं?'' टीका करत आस्तादनं पुढे लिहिलंय, ''औरंगजेबाचं वय आणि आजारपण लक्षात घेतलं, तर तो इतक्या वेगाने चालू शकतो का?'' सोयराबाई राणी सरकार यांचे अंत्यसंस्कार एका रिपवेप नदीकाठी? असं नाही व्हायचं हो'' आस्तादच्या या पोस्टनंतर प्रेक्षकांनी टीकेची झोड उठवली आहे.

सकाळी पोस्ट केल्यानंतर काही तासात आस्तादने ही पोस्ट डिलीट किंवा आरकायू केली आहे कारण त्याच्या फेसबुक टाइमलाइनवर त्याच्या पोस्ट दिसत नाहीत. आस्तादनं चित्रपटात काम करून दोन महिने झाल्यावर अशा प्रकारची टीका करणं योग्य आहे का? असा प्रश्न विचारला जात आहे.

चालत्या कारच्या डिग्गीत लटकता हात, वाशी-सानपाडा दरम्यान थरारक दृश्य, रिल साठी टोक गाठल्याचे उघड!

नवी मुंबई,१५ एप्रिल (पीएसआय)

नवी मुंबईतील वाशी आणि सानपाडा रेल्वे स्थानकांदरम्यान एका इनोव्हा कारच्या डब्यातून एका माणसाचा हात बाहेर लटकत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. सानपाडा आणि वाशी रेल्वे स्थानकांदरम्यानच्या सर्व्हिस रोडवर चालणाऱ्या इनोव्हा कारमध्ये एका व्यक्तीचा हात लटकलेला मागून येणाऱ्या वाहनातील नागरिकांना दिसला. यानंतर मागून येणाऱ्या दुसऱ्या चालकाने त्याचा व्हिडिओ बनवला आणि तो सोशल मीडियावर व्हायरल केला. व्हिडिओमध्ये लटकलेल्या हाताकडे पाहून व्हिडिओ बनवणारा व्यक्ती म्हणत होता, ''असे दिसते की हा एखाद्या मृत व्यक्तीचा मृतदेह आहे किंवा कोणीतरी त्याची हत्या करून गाडीत ठेवला असावा.''

पोलीस तपासात समोर आलं धक्कादायक करण

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, पोलिस आणि गुन्हे शाखेचे पथक तात्काळ कारवाईला लागले. दरम्यान पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करत सोमवारी संध्याकाळी ६.४५ च्या सुमारास हा व्हिडिओ चित्रित करण्यात आल्याची माहिती समोर आली आणि रात्री ८.३० च्या सुमारास पोलिसांनी मुंबईतील घाटकोपर परिसरात कार पकडली. यात पोलिसांनी केलेल्या तपासात धक्कादायक करण समोर आलं असून कारमध्ये बसलेले तीन तरुण त्यांच्या लॅपटॉप ब्रँडच्या प्रमोशनशी संबंधित एक रील बनवत असल्याचे पुढे आले आहे.

तीनही तरुण मुंबईचे रहिवासी

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेत प्रवेश; प्रक्रिया सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत येत असलेल्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकीत निवासी शाळेमध्ये इयत्ता पहिली व दुसरी मध्ये प्रवेश देण्यात येतो, या योजनेअंतर्गत प्रवेश सुरु झाले असून दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी केले आहे.

यासंदर्भात आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या योजनेसाठी लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडुन प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध आहेत. हे अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे कार्यालय तसेच नजिकच्या शासकीय व अनुदानीत आश्रमशाळेत मिळतील. तरी कोणत्याही भुलथापांना बळी न पडता व कोणाच्याही माध्यमातुन प्रवेश अर्ज प्राप्त करुन न घेता या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधुन तसेच नजीकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश अर्ज प्राप्त करुन या कार्यालयास दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज जमा करावे.

अटी व शर्ती : या योजनेचा लाभ घेणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा, पालकाने विद्यार्थ्यांचे नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकीत प्रत द्यावी, जर विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर यादीतील अनुक्रमांक नमूद करावा, या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकाच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा एक लक्षच्या आत असणे आवश्यक आहे. (तहसिलदाराचे), इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय सहा वर्ष पूर्ण असावे, जन्मतारखेचा पुरावा म्हणून ग्रामसेवकाचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल. या योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच विधवा/घटस्फोटित/निराधार/परितक्त्या व दारीद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची



विद्यार्थ्यांचे पालकांनी प्रवेश अर्जासोबत संमतीपत्र व दोन पासपोर्ट फोटो जोडावे, आदीम जमातीच्या प्राधान्याने निवड करण्यात येईल, विद्यार्थ्यांचे पालक शासकीय किवा निमशासकीय नोकरदार नसल्याचे पुरावा म्हणून ग्रामसेवकाचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल, या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकाकडून संमतीपत्र घेण्यात येईल, इयत्ता दुसरीसाठी शिकत असलेल्या शाळेमधील मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र, विद्यार्थ्याच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी, अपुर्ण कागदपत्र असल्यास तसेच खोटी माहिती सादर केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल, असे पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# महापुरुषाच्या विटंबना प्रकरणी अंजनीत तणावाचे वातावरण

## राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन : वाहतूक विस्कळीत







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी : तालुक्यातील अंजनी बु. येथे महामानवाच्या प्रतिमेची विटंबना केल्याप्रकरणी दोन समाजात तणाव निर्माण झाला. त्यानंतर एका गटाने महापुरुषाच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या आरोपीवर कारवाई करावी, या मागणीसाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली होती.याचा फटका प्रवाशांना सहन करावा लागला. सदर घटनेचे गांभीर्य ओळखत पोलीस प्रशासनाने मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात केला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी तणावपूर्ण शांतता असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.**

घटनेबाबत प्राप्त माहितीनसार रामदास बबन चव्हान वय ३५ रा अंजनी बु. ता मेहकर यांनी डोणगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, १५ एप्रिल रोजी आरोपीने रस्त्यावर लावलेल्या महामानवाच्या प्रतिमेच्या खाली लघुशंका करून प्रतिमेची विटंबना करून धार्मिक भावना दुखावल्या. अशी तक्रार दिली सदर तक्रारीवरून पोलिसांनी चार आरोपी विरुद्ध विविध कलमान्वये दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास डोणगाव पोलीस स्टेशनचे एपीआय अमरनाथ नागरे करीत आहेत.घटनेचे गांभीर्य ओळखत उपविभागातील पोलीस कर्मचारी यांना तैनात करण्यात आले आहे.घटनास्थळी उपविभागीय अधिकारी (महसूल ) रविंद्र जोगी, अड्. अनंतराव वानखेडे यांनी जाऊन परिस्थिती जाणून घेतली आहे. तसेच जनतेशी संवाद साधत शांतता ठेवण्याचे आवाहन केले आहे. सदर प्रकरणात दोषी आरोपीवर कारवाई केली जाईल, असे आश्वासने पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांनी तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिली आहे.तर सायंकाळ दरम्यान आ. सिद्धार्थ खरात यांनी गावात जाऊन नागरिकांशी सुसंवाद साधला.

### राज्य महामार्गावर रास्ता रोको अन् हतबल प्रशासन

रास्ता रोको आंदोलनाने वाहतूक विस्कळीत महामानवाच्या प्रतिमेची विटंबना केल्याने दोन समाजात तणाव निर्माण झाला धार्मिक भावना दुखावल्या गेल्यामुळे एका गटातील नागरिकांनी छत्रपती संभाजीनगर ते नागपूर हा राज्य महामार्गावर रास्ता रोको करण्यात केला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही काळ तणाव दिसून आला तर प्रशासन सुद्धा हतबल झाल्याचे दिसून आले.शेवटी पोलीस प्रशासनाने जमावाला शांत करत वाहतूक सुरळीत केली. मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाल्यानंतर पोलीस प्रशासनाने शर्तीचे प्रयत्न करून वाहतूक सुरळीत केली.मात्र,सदर रास्ता रोको आंदोलनाने वाहतूक विस्कळीत झाल्याने अनेकांचे कामे सुद्धा विस्कळीत झाले व नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. पोलीस प्रशासनाने प्रचंड परिश्रम घेत वाहतूक सुरळीत केली...

## विविध वृत्त...

### भा. मा.कन्या शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक १४ एप्रिल रोजी माननीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम यांनी विश्वरत्न बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या ज्ञानाच्या अथांग महासागराला १३४ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेला मालार्पण करत पूजन करून अभिवादन केले. या आधुनिक भारताच्या शिल्पकारांनी आम्हाला काय काय दिले हे सांगत असताना प्राचार्या मंजुषा सू.देशमुख मॅडम यांनी आपले विचार व्यक्त करताना कामाचे बारा तासावरून आठ तास केले, कामगार राज्य विमा, कामगाराला मिळणाऱ्या प्राथमिक सेवा, कामगार संघटनेची मान्यता दिली, भार पगारी सुट्टया , महागाई भत्ता , कायदेशीर संपाचा अधिकार , आरोग्य विमा, कामगार कल्याण निधी, स्त्री-पुरुष समानता, मुलींना समान अधिकार, महिला कामगार संरक्षण कायदा, मतदानाचा अधिकार, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संपूर्ण राष्ट्राला एकसंघ बांधणारे भारतीय संविधान ही एक सर्वात मोठी देन होय. अशा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला कृतीला आणि विचाराला त्रिवार अभिवादन करत आपले मत व्यक्त केले. या जयंती कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.


### 'पोषण परववाडा' सर्व शाळेमध्ये राबवावा - मुख्य कार्यकारी अधिकारी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत दि. ८ ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये पोषण पखवाडामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामध्ये सर्व शाळांनी सहभागी होऊन पोषण पखवाडा यशस्वीपणे राबवावे, असे आवाहन जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.

पखवाडा उपक्रमामध्ये जागरुकता कार्यक्रम, पोषण साक्षरता मोहिम, टॉयथॉन कार्यशाळा, स्पर्धा आणि उपक्रम, पालकांचा सभाग, पारंपारीक आणि स्थानिक अन्न प्रोत्साहन व आरोग्य आणि स्वच्छता जागरुकता असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामध्ये शिक्षणाधिकारी(प्राथमिक), सर्व गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक (शापोआ) वर्ग २ यांच्या अधिनस्त असलेले क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी सर्व व्यवस्थापनाच्या शाळा यांनी सहभागी होऊन पोषण पखवाडा यशस्वीपणे राबवावा.

### मेहकर तालुक्यातील ६५ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण; १६ एप्रिला सोडत



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार मेहकर तालुक्यातील ६५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांची आरक्षण निश्चित करायचे आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३० अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान मेहकर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदांचे आरक्षण दि. १६ एप्रिल २०२५ रोजी तहसिल कार्यालय, मेहकर येथील निवडणूक विभाग येथे सोडत काढण्यासाठी सभा आयोजित करण्यात आले आहे.

तसेच अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती. नागरीकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत स्त्रियांकरिता आरक्षण सोडत दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता सुरु होणार असुन उपविभाग मेहकर अंतर्गत मेहकर तालुक्याचे स्त्रियांकरिता आरक्षण सोडत ठिक दुपारी २ वाजता जिल्हानियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे निश्चित करण्यात येणार आहे. सदर आरक्षण सोडती करीता मेहकर तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षाचे पदाधिकारी व नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सदर ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत मेहकर तहसिलदार निलेश मडके यांनी कळविले आहे.

# दिशा फेडरेशनने जोपासली सामाजिक बांधिलकी





**दैनिक आपला विदर्भ**

**मोताळा/प्रतिनिधी :** तालुक्यातील हनवतखेड येथे १३ एप्रिल रोजी दोन घरांना भीषण आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली. लागलेल्या भीषण आगीत घरातील संपूर्ण साहित्य जळून खाक झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे उघड्यावर आलेल्या दोन कुटुंबांना ॲड.जयश्री शेळके यांच्या सुचनेनुसार दिशा बुलडाणा जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या माध्यमातून कपडे आणि भांडे देऊन मदत करण्यात आल्याने पीडित कुटुंबातील सदस्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. तर सामाजिक बांधिलकी जोपासत दिशा फेडरेशनने केलेल्या या मदत कार्याबद्दल सुद्धा सर्वत्र कौतुक केले जात आहे.

हनवतखेड येथील राहुल दशरथ चव्हाण हे विट भट्टीवर कामाला असतात. त्यांचे भाऊ दिवंगत भरत चव्हाण यांच्या पत्नी श्रीमती किरण भरत चव्हाण ह्या त्यांच्या शेजारीच राहतात. त्यादेखील मोल मजुरी करुनच आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. १३ एप्रिल रोजी कुटुंबातील सर्व सदस्य कामासाठी बाहेर गेले होते. याच दिवशी दुपारी घरांना अचानक आग लागल्याची घटना घडली. यावेळी भरत चव्हाण यांची १२ वर्षाची मुलगी वैशाली घरी एकटीच होती. घराला लागलेली आग पाहून शेजारी राहत असलेल्या मैत्रिणीने तिला सावध केले. सुदैवाने वैशालीला कुठलीही इजा झाली नाही. परंतु लागलेल्या भीषण आगीत घरातील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले आहे. शिवसेनेच्या प्रवक्ता (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ॲड.जयश्री शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून पिडीतांना मदत देण्यासंदर्भात विनंती केली. तसेच ॲड.जयश्री शेळके यांच्या सुचनेनुसार दिशा बुलडाणा जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या माध्यमातून पिडीत कुटुंबियांना कपडे आणि भांडे देऊन मदत करण्यात आली आहे. यावेळी खेडी येथील संजय दांडगे, भारत निर्मळे, अनिल लाजगे, दिशा फ ेडरेशनच्या जिल्हा समन्वयक स्मिता वराडे, किरण वराडे, मंगेश उबरहंडे, राहुल बाजारे इत्यादींची उपस्थति होती.

### पुण्यातील उद्योगपतीचा 'सायबर मर्डर'; ई-मेलद्वारे बिहारला बोलावून संपवले; खळबळजनक घटनेचा तपास सुरु

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. पुण्यातील उद्योगपतीची बिहारच्या पाटण्यात खून झाल्याची घटना घडली आहे. लक्ष्मण साधू शिंदे अस हत्या झालेल्या उद्योगपतीचे नाव आहे. कंपनीच्या कामासाठी ई-मेल करत पाटण्यात बोलावून घेत उद्योगपतीची हत्या केल्याची माहिती समोर येत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण साधू शिंदे (५५) हे कोथरूड परिसरातील उद्योगपती असून त्यांना कंपनीचे काही टूल्स आणि मशीनरी स्वस्त भावात विकत देतो, असा ई-मेल आरोपींकडून करण्यात आला होता. या ई-मेलद्वारे लक्ष्मण शिंदे यांना पाटण्यात बोलावून घेण्यात आले.

कंपनीसाठी स्वस्तात मशिनरी मिळेल, यासाठी उद्योगपती लक्ष्मण शिंदे हे बिहारला गेले होते. उद्योगपती शिंदे पाटण्यात पोहोचतच त्यांचे अपहरण करण्यात आले. यानंतर त्यांना एका शेतात नेऊन पैशांची मागणी करण्यात आली. मात्र उद्योगपती शिंदे यांनी पैसे दिले नाही, त्यामुळे त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणात तीन ते चार आरोपी असल्याचे माहिती पोलिसांकडून मिळत आहे. दरम्यान, उद्योगपती पुन्हा परतले घरी परतले नसल्याने कोथरूड पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या कुटुंबीयांनी लक्ष्मण शिंदे हे बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. काल पाटण्यात उद्योगपती शिंदे यांचा मृतदेह आढळून आला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## जलव्यवस्थापन कृती पंधरवडा चे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

# पाण्याच्या व्यवस्थापनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलडाणा/प्रतिनिधी :** पाण्याच्या योग्य व्यवस्थापनासाठी प्रशासनासोबत प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग घेणे गरजेचे आहे. सामूहिक प्रयत्नांशिवाय पाण्याचे व्यवस्थापन करणे शक्य नाही. पाण्याचे संरक्षण ही एक सामूहिक जबाबदारी असून ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

नागरिकांना पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देण्याबरोबरच जलसाक्षरता वाढीसाठी जिल्ह्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान आयोजित जलव्यवस्थापन कृती पंधरवडाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे अधिक्षक अभियंता बापूसाहेब गाडे, अधिक्षक अभियंता श्रीराम हजारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, कार्यकारी अभियंता सु. श. सोळंके, प्र.पु. संत, अ. भा. चोपडे, तु.चं. मेतकर, परमजितसिंग जुनेजा आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, जलव्यवस्थापन कृती पंधरवडात सर्वांनी समन्वयाच्या माध्यमातून उद्दिष्टानुसार कार्यक्रमाचे योग्य व्यवस्थापन करावे. तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांचाही यात सहभाग घ्यावा. बुलढाणा हा कृषीप्रधान जिल्हा असून शेती हा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे शेती जास्तीत जास्त सिंचनाखाली आणण्यासाठी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. यासाठी पाण्याचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा समावेश करण्याबाबत जनजागृती करावी. उद्योगाना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे काटकसरीने वापर करावा. पाण्याचे शुद्धीकरण करुन पुर्नवापर करावा. पाण्याचे पुरवठा करणारे पाईपलाईन, कालवे यांचे नियमित दुरुस्ती, स्वच्छता ठेवावी. तसेच नागरिकांमध्ये पाण्याचे महत्व व त्यांचे काटकसरीने वापरण्याबाबत जनजागृती करण्याचे सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात गाळमुक्त धरण, जलयुक्त शिवार, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना, मनरेगा अंतर्गत पाणी सर्वधनासाठी विविध उपक्रम प्रभाविपणे राबविण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना पाण्याचे महत्व समजावणे आणि गावातील पाण्याचे बजेट तयार करणे गरजेचे आहे. पाण्याची कमतरता असताना पाणी उपचारावरही भर देण्यात यावा. सर्व विभागांनी केवळ १५ दिवस उपक्रम न राबविता वर्षभर निश्चित उद्दिष्ट समोर ठेऊन नियोजनावर भर द्यावाख् असे आवाहन त्यांनी केले. पाण्याचे स्रोत मर्यादित असून पाण्याची मागणी वाढते आहे. ही तफावत दूर करून पाण्याचा कार्यक्षम वापर, पाणी व्यवस्थापनाचे नवे तंत्र आणि बिगर सिंचनाच्या पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने जल व्यवस्थापन कृती आराखडा घरोघरी पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गावपातळीवर पोहोचून पाण्याशी निगडित नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी स्वप्रेरणेने सामुहिक प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२५ कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जाणार आहे. तसेच विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सिंचन व्यवस्था, कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडामध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यात येणार आहे. यासाठी स्थानिक प्रशासन आणि नागरिकांच्या सहभाग घेण्यात येणार आहे, अशी माहिती अधिक्षक अभियंता बापूसाहेब गाडे यांनी दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांनी जलप्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डी. टी. शेगोकार यांनी तर आभार प्रदर्शन अ. भा. चोपडे यांनी केले.